॥ उपर्युपरी तिष्ठेत आदित्य इव तेजसा ॥

मायणी भाग शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित

# कला, वाणिज्य महाविद्यालय, मायणी.

## ११ वे मराठी ग्रामीण साहित्य संमेलन (१५ फेब्रुवारी, २०१९)

## - अहवाल -

साहित्य ही जीवन समृद्ध करणारी कला आहे. योग्य वयात मुलांना साहित्याची गोडी लागली, तर त्यांच्या जीवनाला योग्य वळण लाभते. मानवी जीवनातील सौंदर्य आणि श्रेयस-प्रेयस यांची जाणीव होते. यासाठीच महाविद्यालयात प्रतिवर्षी ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन केले जाते. चालू वर्षी ११ व्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत शुक्रवार दि. १५ फेब्रुवारी, २०१९ रोजी स्व.ज.गो.जाधव सभागृहात करण्यात आले. यावर्षी संमेलनाध्यक्ष म्हणून ज्येष्ठ कादंबरीकार नामदेव माळी (विसापूर) यांची निवड करण्यात आली. त्यांचे 'आभाळदानी', 'शंभर टक्के निकाल', 'तरवाड' हे कथासंग्रह तर 'खरडछाटणी', 'छावणी' या कादंबऱ्या प्रकाशित आहेत. त्यांना महाराष्ट्र शासनाचा कर्मवीर भाऊराव पाटील साहित्य पुरस्कार यासह सात पुरस्कार मिळाले आहेत.

संमेलनाचे उद्‌घाटन मा.भा.शि.प्र.मंडळाचे सचिव श्री. सुधाकर कुबेर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. साहित्य ही आनंददायी कला आहे, हे स्पष्ट करताना ते म्हणाले, " युवकांनी अनेक प्रकारचे साहित्य वाचावे. कथा-कवितांचा आस्वाद घ्यावा. लेखक मुळातून समजून घ्यावा आणि मगच आपल्या अनुभवाला शब्दरूप द्यावे. अखिल भारतीय साहित्य संमेलनातही एखाद्या लेखिकेला बोलू दिले जात नाही, त्याविरुद्ध आवाज उठविला पाहिजे."

संमेलनाध्यक्ष नामदेव माळी म्हणाले, " आज समाजात राजकारणामुळे फूट पडत आहे. युवक व्यसनाधीन होत आहेत. योग्य वयात त्यांच्या हातात ग्रंथ आणि लेखणी आली तर त्यांचे उज्ज्वल भविष्य घडू शकेल. आज स्वतःचे अनुभव मांडणाऱ्या प्रत्येकाचा सन्मान होतो. अनुभवसंपन्न लेखक चांगले लिहू शकतो."

'**साहित्यचर्चा**' या दुसऱ्या सत्रात प्रा.डॉ. महेश गायकवाड (सातारा) यांनी 'सोशल मीडिया आणि साहित्य' या विषयावर अभ्यासपूर्ण मांडणी केली. ते म्हणाले, "सोशल मीडियामुळे नव्या पिढीला व्यक्त होण्यासाठी अवकाश मिळाला आहे. परंतु तरुणांनी सोशल मीडियाच्या आहारी जाऊ नये. त्यावरील माहिती ही कधीकधी फसवी व दिशाभूल करणारी असते. त्यामुळे विश्वासार्हता असलेल्या माहिती व चित्रणाला प्रतिसाद दिला पाहिजे. युवकांचे भरकटणे देशाच्या भवितव्यासाठी घातक असते."

तिसऱ्या सत्रात सौ. अर्चना लाड (पलूस) यांचे बहारदार **कथाकथन** झाले. त्यांनी 'बाब्याचं लगीन' ही कथा सादर केली. चौथ्या सत्रात **कविसंमेलन** झाले. प्रा. डॉ. अशोक शिंदे (फलटण) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कविसंमेलनात सोळा नवोदित कवींनी सहभाग घेतला. त्यामध्ये कवी आकाश आढाव (फलटण), राहूल निकम (अकलूज), दत्ता कदम (फलटण), किरण अहिवळे (पळसगांव), विठ्ठल भागवत (विटा), मोहसिन आत्तार (मलवडी), शाहीर नारायण कदम (धोंडेवाडी), कुंदा कांबळे (मायणी), महेश मोरे (निमसोड), आनंद बागल (कातरखटाव), सौ. रंजना सानप (मायणी), कु, श्रीमयी दिवटे (मायणी), कु, सानिका त्रिंबके (मायणी) यांनी सहभाग घेतला.

दरम्यान, संमेलनाचे स्वागताध्यक्ष मा. सुरेंद्र गुदगे (चेअरमन मा.भा.शि.प्र.मंडळ, मायणी) यांचे हस्ते शिवाजी जाधव, विटा यांच्या 'झुंज' या आत्मकथनाचे **प्रकाशन** झाले. त्यावेळी बोलताना मा.सुरेंद्र गुदगे म्हणाले, " विद्यार्थ्यांच्या हाती मोबाईलऐवजी पुस्तक असले पाहिजे. तरुण पिढीने लेखन कला आत्मसात केली पाहिजे." याप्रसंगी पत्रकार अंकुश चव्हाण यांनी पुस्तकाचे परिक्षण सादर केले.

संमेलनासाठी संचालक, श्री. एन.व्ही. कुबेर, श्री. दिगंबर पिटके, श्री. प्रशांत सणगर, प्रा. सदाशिव खाडे आदी मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य डॉ. संजय कांबळे (पाचवड ता. वाई) यांनी संमेलनास हजेरी लावली. संमेलनाच्या यशस्वीतेसाठी प्रा. शिवशंकर माळी, डॉ. शौकतअली सय्यद. डॉ. विजया कदम व सर्व प्राध्यापक वृंद यांनी परिश्रम घेतले, संमेलनाच्या निमित्ताने विज्ञान विभागाचे प्रा. कालिदास सरकाळे व प्रा. प्रतीक कांबळे यांनी पोस्टर प्रदर्शन भरविले. संमेलनास उपस्थित सुमारे २७५ विद्यार्थी व रसिकांना स्नेहभोजन देण्यात आले. प्रा. डॉ. सयाजीराजे मोकाशी यांनी संमेलनाच्या यशस्वीतेसाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

समन्वयक

डॉ. श्यामसुंदर मिरजकर